नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज


संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २०१ Issue - 201 | वार गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५ Blow- Thursday Date 11 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मुंढवा जमीन घोटाळ्यात पार्थ पवारांचे नाव का नाही?

### हायकोर्टाचा राज्य सरकारला थेट सवाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : शहरातील मुंढवा (झींपश) ४० एकर जमीन घोटाळ्याप्रकरणी दाखल एफआयआरमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या मुलाचे नाव का नाही? असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने (क्ळसह लेीिीं) विचारला आहे. त्यामुळे, आता गेल्या महिनाभरापासून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि राजकीय विरोधकांकडून राज्य सरकार तसेच पोलिसांना जो प्रश्न विचारला जात होता, तोच प्रश्न आता चक्क उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारला आहे. दरम्यान, पोलिसांनी यावर भूमिका मांडली असली तरी पार्थ पवार (झरींह रिरी) यांच्या नावाचा मुद्दा पुन्हा समोर आला आहे.

मुंढव्यातील ४० एकर जमीन घोटाळाप्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणात शीतल तेजवानी मुख्य आरोपी असून तिची चौकशी देखील करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी ही जमीन खरेदी करण्यात आली होती. त्यामध्ये, प्रकरणातील तप-ासाचा वेग वाढवल्यानंतर पोलिसांनी मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवाणीची दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत तिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली. त्यानंतर, तिने जामीनासाठी हायकोर्टात धाव घेतली आहे.

मुंबई उच्च न्यायालयात मुंढवा जमीन प्रकरणी सुरू असलेल्या जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने राज्य सरकारला पार्थ पवार यांचे नाव एफआयआरमध्ये का नाही? असा थेट सवाल केला आहे. दरम्यान, याप्रकरणी आमचा तपास सुरू असल्याची भूमिका पुणे पोलिसांनी न्यायालयात मांडली. शीतल तेजवानीने बावधन पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावर, हायकोर्टाकडून अजित पवारांच्या मुलाचे नाव का नाही, असा थेट सवाल विचारण्यात आला. दरम्यान, मुंढवा जम ीन घोटाळाप्रकरणी अटकेत असलेल्या शीतल तेजवानी यांनी याप्रकरणी अटकपूर्व जामीनासाठी पुणे सत्र न्यायालयात अर्ज केलेला असताना आणि न्यायालयाने प्रतिवाद्यांना नोटीस बजावली असताना थेट उच्च न्यायालयात आल्याबद्दल न्यायालयाने नाराजी देखील व्यक्त केली. उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केल्यानंतर याचिका मागे घेत असल्याची माहिती वकिलांनी दिली. मात्र, या सुनावणीमुळे पुन्हा एकदा पार्थ पवार यांचे नाव चर्चे त आले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल होणार का, पोलिसांच्या एफआयआरमध्ये पार्थ पवार यांचे नाव येणार का? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

### बाजारमूल्यानुसार प्रीमियमचे दर निश्चित

## जमिनीच्या एनए अटीनंतर आता 'सनद'ची अटही रद्द




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्यातील जमीन महसूल प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अकृषिक परवानगीची अट म्हणजे एनए (छ) रद्द केल्यानंतर आता त्यापुढील 'सनद' घेण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. त्या संदर्भातील 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक २०२५' महसूलमंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी विधानसभेत मांडले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत या विधेयकाची पार्श्वभूमी मांडताना स्पष्ट केले की, १९६६ च्या जमीन महसूल संहितेमध्ये २०१४ ते २०१८ दरम्यान सुधारणा करून रहिवासी आणि वाणिज्यिक वापरासाठी छ (अकृषिक) परवानगीची अट यापूर्वीच शिथिल करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही 'सनद' घ्यावी लागत असल्याने प्रक्रियेत क्लिष्टता होती. आता ही अट पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, त्याऐवजी नाममात्र प्रीमियम (अधिमूल्य) आकारला जाणार आहे. जमिनीच्या वापरासाठी आता सनदची गरज नसून, खालीलप्रमाणे रेडी रेकनरच्या (बाजारमूल्य) आधारावर प्रीमियम भरून वापर नियमित करता येईल.

१००० चौरस मीटरपर्यंत : रेडी रेकनरच्या ०.१ टक्का., १००१ ते ४००० चौरस मीटरपर्यंत: रेडी रेकनरच्या ०.२५ टक्के., ४००० चौरस मीटर व त्यापुढील भूखंडांसाठी : रेडी रेकनरच्या ०.५ टक्के., या बदलामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या करात किंवा शुल्कात कोणतीही कपात होणार नसून, त्यांना त्यांचा वाटा मिळणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

या विधेयकावर चर्चा करताना विरोधकांनी या निर्णयाचे स्वागत केले. अकृषिक कराची अट रद्द करून सनदची प्रक्रिया सोपी केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. आमदार विक्रम काळे, प्रवीण दटके, योगेश सागर, रमेश बोरनारे, जयंत पाटील यांनी विधेयकाचे स्वागत तर महसूलमंत्री बावनकुळे यांचे अभिनंदन केले. काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी यावेळी शेतजमिनी वाचवण्याचा मुद्दा उपस्थित केला. शहरीकरणामुळे कृषक जमीन कमी होत चालली आहे आणि दुसरीकडे पुरामुळे नदीकाठची जमीन खरडून जात आहे. त्यामुळे कृषक जमीन टिकवणे हे मोठे आव्हान असल्याचे मत त्यांनी मांडले.

## निवडणूक सुधारणांवरून लोकसभेतील खडाजंगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: संसदेच्या हिवाळी अधिवेशनात निवडणूक सुधारणांवर भाषण करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचा पारा चढला. लोकसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना त्यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर शाब्दिक हल्ला चढवला. भाजपचे नेते निवडणूक सुधारणांच्या चर्चेपासून पळत नाहीत, असं शहा म्हणाले. तेव्हा सभागृहात असलेले राहुल गांधी उभे राहिले. त्यांनी अमित शहांना खुलं आव्हान दिलं. यानंतर लोकसभेतील वातावरण चांगलंच तापलं.



मी मत चोरीवर तीन पत्रकार परिषदा घेतलेल्या आहेत. तुम्ही त्याच्यावर चर्चा करा, असं खुलं आव्हान राहुल गांधी यांनी शहांना दिलं. यावर शहांनी उत्तर दिलं. 'गेल्या ३० वर्षांपासून मी विधानसभा आणि लोकसभेत निवडून येत आहे. मला संसदीय कार्य प्रणा-लीचा प्रदीर्घ अनुभव आहे. विरोधी पक्षनेते म्हणतात, तुम्ही आधी माझ्या प्रश्नाला उत्तर द्या. मी त्यांना सांगू इच्छितो की संसद तुमच्या हिशोबानं चालत नाही. माझ्या भाषणाचा क्रम मी निश्चित करेन. संसद याच पद्धतीनं चालेल,' असं शहा म्हणाले.

माझं उत्तर ऐकण्यासाठी विरोधी पक्षनेत्यांनी संयम ठेवावा, असा सल्ला शहांनी दिला. 'एक-एका गोष्टीला उत्तर दिलं जाईल. पण माझ्या भाषणा-चा क्रम ते निश्चित करु शकत नाहीत. मला कसं उत्तर द्यायचं आहे, ते मी ठरवेन. मी सगळ्या मुद्द्यांना उत्तर देईन. माझ्या भाषणाचा क्रम मी निश्चित करेन, तो अधिकार विरोधी पक्षनेत्यांचा नाही. त्यांनी कितीही चिथावलं तरी-ही मी माझ्या पद्धतीनं भाषण करेन. सोनिया गांधींच्या प्रकरणात यांना न्यायालयात उत्तर द्यायचं आहे. ते इथे उत्तर का देत आहेत,' असा सवाल शहांनी केला.

त्यावर राहुल गांधी लगेच उत्तर दिलं. गृहमंत्र्यांचं प्रत्युत्तर पाहता ते घाबरलेले दिसतात. त्यांच्या उत्तरात भीती दिसते. त्यांचा प्रतिवाद खरा नाही, असं राहुल म्हणाले. त्यावर त्यांच्या कपाळ्यावर चिंतेचे भाव स्पष्ट दिसत आहेत. त्यांनी कितीही चिथ-ावणी दिली तरी मी माझ्याच क्रमाने बोलणार, असं अमित शहा म्हणाले.

## कोण होतास तू, काय झालास तू? अमित शाहांचा व्हिडिओ शेअर करत फडणवीसांचा उद्धव ठाकरेंना टोला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राजकीय बदलाचे वारे वेगाने वाहिले असून २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडली. मात्र, तेव्हापासूनच भाजप आणि ठाकरेंच्या शिवसेनेत राजकीय युद्ध सुरू झालं आहे. त्यावरुन, सातत्याने भाजप नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे एकमेकांवर टीकेची झोड उठवतात. अनेकदा व्यक्तिगत टीका टीपण्णी देखील केल्याचं पाहायला मिळालं. आता, पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री अमित शाहांचा एका व्हिडिओ ट्विट करत उद्धव ठाकरेंना डिवचलं आहे. तसेच, कोण होतास तू, काय झालास तू? असे म्हणत अल्पसंख्यांकांची मतं मिळवण्यासाठी हिंदुत्त्व सोडल्यावरुन अप्रत्यक्षपणे निशाणा साधला.



अमित शाह यांनी संसदेत भाषण करताना पंडित जवाहरलाल नेहरुंनंतर इंदिरा गांधी आणि नंतर सोनिया गांधींचा निवडणुकीतील विजय ही सर्वात मोठी व्होटचोरी असल्याचा गंभीर आरोप आज सभागृहात बोल-ताना केला. तसेच शिवसेना पक्षप्रम ुख उद्धव ठाकरेंवरही जोरदार निश-ाणा साधला. सध्या, न्यायाधीशांच्या निर्णयावरही आक्षेप घेतला जात आहे, स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच एखाद्या न्यायाधीशांविरुद्ध महाभियोग प्रस्ताव दाखल करण्यात येत आहे. आपल्या व्होट बँकेसाठी हे अशा-पद्धतीने महाभियोग आणत आहेत, उद्धव ठाकरेंनी यावर सही केलीय, असे म्हणत अमित शाहांनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं. उद्धव ठाकरेंनीही मतपेढीचं राजकारण केल्याचे अमित शाहांनी म्हटले. दरम्यान, हे जजमेंट काय आहे तर, एका डोंगरावर सर्वांच उंच दिवा पेटवला जावा, या निर्णयावरुन हा प्रस्ताव आल्याचं अमित शाह यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, अमित शाह यांचा संसदेतील भाषणाच्या व्हिडिओची एक क्लिप शेअर करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना डिवचलं आहे. कोण होतास तू, काय झालास तू? असे म्हणत देवेंद्र फडणवीसांना उद्धव ठाकरेंना टोला लगावला.

राहुल गांधी यांच्याकडून करण्यात आलेले मतचोरीचे सर्व आरोप अमित शाहांनी फेटाळले. व्होटचोरीच्या आरोपांवरुन आज दिल्लीच्या सभागृहात जोरदार गदारोळ झाला. त्यानंतर संतापलेल्या विरोधकांनी सभात्याग करत निषेध व्यक्त केला. लोकसभेत अमित शहा यांनी इलेक्टरल रिफॉर्मवर चर्चा करताना विरोधकांना धारेवर धरलं. त्यांच्या भाषणात त्यांनी नागरिकत्व, डखठ, ततझढ, मतदार याद्या अश्या अनेक मुद्द्यांना हात घातला आणि त्याची उदाहरणं देत विरोधकांवर हल्लाबोल केला.

### राष्ट्रीय योजना व कृती आराखड्याबाबत राज्यस्तर गठीत समितीची आढावा बैठक

### नवीन पोलिस चौकी उघडलेल्या ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करा


## महाराष्ट्र नक्षलवाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : केंद्र शासनाने देशा-तून २०२६ पर्यंत नक्षलवाद हद्दपार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्र या उद्दिष्टपूर्तीत एक पाऊल पुढे असून महाराष्ट्र नक्षलवाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर उभे आहे. राज्य शासनाने राबविलेल्या दूरदृष्टी धोरणांमुळे आणि पोलिसांच्या प्रयत्नांमुळे हे शक्य होत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातून नक्षलवाद संपूर्ण संपुष्टात आणण्यासाठी अति दुर्गम भागात पोलीस चौकी सुरू कराव्यात. सर्व पोलीस चौकीमध्ये आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करून सर्व सुविधा देण्यात याव्यात. नक्षलवाद म ुक्त झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवीन पोलीस चौकी झालेल्या ठिकाणी विविध कल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन करावे. अशा कार्यक्रमांमध्ये शासकीय योजनांचा लाभ गावकऱ्यांना देण्यात यावा. येथील युवकांसाठी रोजगार उपलब्ध करून द्यावा, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून स्थानिक उत्पादनांना विक्रीसाठी बाजारपेठ निर्माण करून द्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

राष्ट्रीय योजना व कृती आराखड्याबाबत एकसुत्री कृती यंत्रणा संरचनेनुसार राज्यस्तर गठीत समितीची आढावा बैठक विधानभवनातील मंत्री परिषद सभागृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणा-ले, बक्षीस असलेल्या नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण पोलिसांच्या प्रयत्नांमुळे शक्य झाले आहे. जहाल नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण करून नक्षल चळवळ मोडीत काढण्यासाठी पुढे आलेल्या गडचिरोली पोलिसांना एक कोटी रुपये बक्षीस देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. नक्षल चळवळीचा बिमोड करण्यासाठी चांगले काम केलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी. मंत्रालय स्तरावर गडचिरोली जिल्ह्या-तील कुठलाही विषय आल्यास नियम ानुसार त्याला प्राधान्याने पूर्णत्वास न्यावे.

गडचिरोली येथे नवीन पोलीस अधीक्षक इमारतीचे काम सुरू करावे. या इमारतीसाठी निधी उपलब्धता करून देण्यात येईल. तसेच पोलीस दलात ३३ नवीन वाहनांची खरेदी प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अप्पर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, अप्पर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग, अतिरिक्त पोलीस महासंचालक (विशेष) शीरिंग दोरजे, केंद्रीय राखीव पो-लीस बलाचे अतिरिक्त महासंचालक अजय शर्मा आदींसह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. पोलीस उप महानिरीक्षक अंकित गोयल यांनी बैठकीत सादरीकरण केले.

**नक्षलवाद्यांनी आनंद साजरा केलेल्या ठिकाणीच पोलीस चौकीची निर्मिती**

८ ऑक्टोंबर २००९ मध्ये भामरागड तालुक्यातील लाहेरी येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात १७ पोलीस जवान शहीद झाले होते. यानंतर नक्षलवाद्यांनी आनंद उत्सव साजरा केला, नक्षल्यांनी आनंद उत्सव साजरा केलेल्या ठिकाणीच पोलिसांनी नवीन पोलीस चौकीची निर्मिती केली आहे. यामुळे या भागात नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास वाढला आहे. नक्षलवाद संपुष्टात येत असल्याचे हे मूर्तीमंत उदाहरण आहे.

**नक्षल चळवळीला विकासकामांनी उत्तर**

गडचिरोली जिल्ह्यातील १७.३० किलोमीटर लांबीच्या धोडराज - निलगुंडा - कवंडे रस्त्याची निर्मिती करण्यात येणार, कवंडेच्या पुढे कोरमा नाला पूल आणि बेद्रे पुलाची निर्मिती करण्यात येऊन पुढे बिजा-पूर पर्यंत रस्ता जोडणी देण्यात येणार येईल . इंद्रावती नदीवर दामरंचा ते सांद्रा मार्गावर ७५० मीटर लांबीच्या पुलाची निर्मिती करण्यात येणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात उत्तम संपर्क यंत्रणेसाठी २०२२ पर्यंत गडचिरोली जिल्ह्यात २७१ मोबाईल टॉवर त्याम ध्ये भरीव वाढ होऊन २०२३ ते २५ दरम्यान ५२१ नवीन मोबाईल टॉवरची निर्मिती करण्यात आली आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



संपादकीय....

## महत्त्वपूर्ण पाऊल

राज्यातील जमीन महसूल प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अकृषिक परवानगीची अट म्हणजे एनए (छ) रद्द केल्यानंतर आता त्यापुढील 'सनद' घेण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. त्या संदर्भातील 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक २०२५' महसूलमंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी विधानसभेत मांडले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत या विधेयकाची पार्श्वभूमी मांडताना स्पष्ट केले की, १९६६ च्या जमीन महसूल संहितेमध्ये २०१४ ते २०१८ दरम्यान सुधारणा करून रहिवासी आणि वाणिज्यिक वापरासाठी छ (अकृषिक) परवानगीची अट यापूर्वीच शिथिल करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही 'सनद' घ्यावी लागत असल्याने प्रक्रियेत क्लिष्टता होती. आता ही अट पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, त्याऐवजी नाममात्र प्रीमियम (अधिमूल्य) आकारला जाणार आहे. जमिनीच्या वापरासाठी आता सनदची गरज नसून, खालीलप्रमाणे रेडी रेकनरच्या (बाजारमूल्य) आधारावर प्रीमियम भरून वापर नियमित करता येईल. या बदलामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या करात किंवा शुल्कात कोणतीही कपात होणार नसून, त्यांना त्यांचा वाटा मिळणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे. या विधेयकावर चर्चा करताना विरोधकांनी या निर्णयाचे स्वागत केले. अकृषिक कराची अट रद्द करून सनदची प्रक्रिया सोपी केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

# शीघ्र प्रतिसाद देणाऱ्या वैद्यकीय पथकांचे नियोजन करा

**विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम; नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक, (जिमाका): नाशिक – त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिका, जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आणि जिल्हा शल्यचिकित्सकांनी सूक्ष्म नियोजन करावे. आवश्यक तेथे फिरते आणि शीघ्र प्रतिसाद देणा–या आरोग्य पथकांचे नियोजन करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी सिंहस्थ कुंभमेळा कामांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील (ग्रामीण), जिल्हा शल्य चिकित्सक डॉ चारुदत्त शिंदे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, लेखा व कोषागारे विभागाचे सहसंचालक बी. डी. पाटील, उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे, पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. योगेश चित्ते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल,यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. गेडाम म्हणाले की, कुंभमेळ्यानिमित्त देश– विदेशातून भाविक येतील. त्यांच्यासाठी अद्ययावत, दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी. त्याबरोबरच रुग्णालयांचे श्रेणीवर्धन, अतिदक्षता कक्ष कार्यान्वित ठेवावा. त्यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी आणि अन्य मनुष्यबळ गुणवत्तापूर्ण असावे. साधूग्राम, घाट परिसरात दोन्ही बाजूला, वाहनतळ, रेल्वे स्थानक, बसस्थानक, आखाड्याच्या ठिकाणी, पर्यटनस्थळांच्या तसेच पोलिस, आरोग्य सेवक, स्वच्छता कर्मचारी आदी अत्यावश्यक सेवेच्या कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या ठिकाणी आरोग्य पथक, रुग्णवाहिका, आवश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून ठेवावा. तसेच पोलिसांच्या मदतीने रुग्णालयांपर्यंतचा मार्ग निश्चित करावा.




याबरोबरच परिसरातील शासकीय, निमशासकीय, खासगी रुग्णालये, तेथे उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवा, उपलब्ध यंत्रसामग्री यांचीही माहिती संकलित करून ठेवावी. कुंभमेळ्यात सेवेसाठी येणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची निवास व्यवस्था अद्ययावत आणि दर्जेदार राहील याची दक्षता घ्यावी. नाशिकबरोबरच त्र्यंबकेश्वर येथेही याच प्रकारच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशाही सूचना विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी दिल्या.

कुंभमेळा आयुक्त सिंह यांनी कुंभमेळा कालावधीत द्यावयाच्या आरोग्य सेवेबाबत मार्गदर्शन केले. महानगरपालिका आयुक्त खत्री यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून, तर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिंदे, आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. चित्ते यांनी जिल्हा, उपजिल्हा आणि ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेची सविस्तर माहिती दिली. तसेच कुंभमेळ्याच्यादृष्टीने करण्यात येत असलेल्या नियोजनाचे सादरीकरण केले.

# ओबीसी महामंडळाकडील कर्ज प्रकरणात व्याज परताव्यासाठी निधीची कमतरता नाही : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी स्थापन केलेल्या महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या योजनांच्या कर्ज प्रकरणाच्या व्याज परताव्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.




सदस्य डॉ.परिणय फुके यांनी याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही ग्वाही दिली. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य अभिजीत वंजारी, उमाताई खापरे यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, इतर मागासवर्ग प्रवर्ग समाजातील दुर्बल घटकांना कर्ज वाटप व इतर योजनांच्या अंमलबजावणी तसेच त्या समाजासाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवा यासाठी शासनाने लक्षित घटक या संकल्पनेवर आधारित उप कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात सर्व उपकंपन्यांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून दुसऱ्या टप्प्यात संबंधित समाजातील प्रतिनिधींना संचालक मंडळावर स्थान देण्यात येणार आहे.

कर्जवाटपाच्या नवीन पद्धतीअंतर्गत अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर बँकेमार्फत कर्ज देणे आणि राज्य सरकारकडून व्याज परतावा देण्याची योजना लागू केली असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले, महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जाच्या अटी व शर्तीमध्ये शिथिलता आणल्या आहेत. कर्ज प्रकरणांसाठी दोन जामीनदार ऐवजी एक जामीनदार घेण्याची मुभा दिली आहे. सिडकोमध्ये नवीन ऑफिस कार्यान्वित करण्यात येत असून महामंडळाच्या सर्व योजनांचा लाभ ऑनलाईन दिला जाणार आहे. तसेच महामंडळांकडील योजनांची प्रचार प्रसिद्धीही मोठ्या प्रमाणावर केली जात असल्याचे ते म्हणाले.

मंत्री श्री. सावे म्हणाले, ऑक्टोबर २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व मुख्य कंपनी व त्याअंतर्गत स्थापित १४ उपकंपन्यांमार्फत २९ हजार १६२ लाभार्थ्यांना पण ५६ हजार ९५५.६६ लाख इतक्या रकमेची मंजुरी दिली आहे. तर सन २०२४– २०२५ मध्ये महामंडळाकडील योजना राबविण्यासाठी ४ कोटी ४४ लाख ८७ हजाराचा निधी उपलब्ध करून दिला आहे. सन २०२५–२०२६ मध्ये महामंडळाच्या मुख्य कंपनीला भांडवली अंशदानाकरिता मूळ तरतूद १५ कोटी व सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशन पुरवणी मागणीमध्ये ५० कोटी अशी ६५ कोटीची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्रात भीक मागणं ठरणार बेकायदेशीर! दोन्ही सभागृहात विधेयक मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर: महाराष्ट्रातील भीक मागण्यास प्रतिबंध घालण्यासाठी तयार करण्यात आलेले महत्त्वाचे विधेयक विधान परिषदेत मोठ्या गोंधळाच्या वातावरणात मंजूर झाले. या विधेयकातील शब्दप्रयोग, उद्देश आणि स्पष्टीकरणामध्ये विरोधाभास असल्याचे अनेक सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे यावर पुनर्विचार करण्यासाठी दिनांक १३ डिसेंबर रोजी सभापतींच्या दालनात विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत विधेयकातील विसंगती, सदस्यांच्या सूचना आणि पुढील प्रक्रिया यावर विस्तृत चर्चा होणार आहे.

हे विधेयक विधानसभेत मंजूर झाल्यानंतर मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत सादर केले. मात्र, अनेक सदस्यांनी या विधेयकाची भाषा, अटी आणि तत्त्वांवर आक्षेप घेतल्याने सभागृहात तणाव निर्माण झाला. मर्यादित चर्चेनंतर लगेचच विधेयक मंजूर केल्याने सदस्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे आमदार एकनाथ खडसे यांनी 'महारोगी' हा शब्द शैलीतून वगळला असला तरी विधेयकाच्या शीर्षक आणि मजकूरात ताळमेळ नसल्याचे स्पष्ट केले. शिवसेना (शिंदे गट)च्या आमदार मनीषा कायंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मिटकरी यांनीही विधेयकाची



भाषा आणि स्वरूपाबाबत नाराजी व्यक्त केली.

उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही या विधेयकातील तांत्रिक अस्पष्टतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संबंधित विभागाकडून अधिक स्पष्ट माहिती आणि स्पष्टीकरण मागितले. विशेषतः विधेयकाच्या शीर्षकात बदल करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

विधेयकावर नोंदवलेले आक्षेप आणि चर्चा न होता मंजुरी घेण्यात आल्याने सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यामुळे १३ डिसेंबर रोजी सभापतींच्या दालनात होणाऱ्या बैठकीत या विधेयकातील त्रुटी, सुधारणा आणि पुढील निवाड्यावर चर्चा होणार असून त्या आधारे पुढील दिशा निश्चित केली जाईल.

या विधेयकाचा मूळ उद्देश राज्यातील भीक प्रथा कमी करणे हा असला, तरी त्यातील काही तरतुदी आणि भाषेतील विसंगतींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. म्हणूनच सदस्यांच्या सूचनांचा विचार करून कायद्याची सुसंगती राखण्यासाठी बैठक निर्णायक ठरणार आहे. या बैठकीनंतर या विधेयकासंबंधी पुढील गोष्टी स्पष्ट होणार आहेत.

# संचार लेखा नियंत्रक कार्यालयात पणजी येथे पेन्शन अदालतचे आयोजन

पणजी : संचार लेखा नियंत्रक (सीसीए), महाराष्ट्र आणि गोवा कार्यालयाने आज ९ डिसेंबर रोजी गोव्यातील पणजी इथल्या संचार भवन येथे त्रैमासिक पेन्शन अदालतचे आयोजन केले. महाराष्ट्र आणि गोवा चे संचार लेखा नियंत्रक डॉ. सतीश चंद्र झा या अदालतच्या अध्यक्षस्थानी होते.

अदालतच्या कार्याबद्दल माहिती देताना डॉ. झा म्हणाले की दूरसंचार विभाग आणि बीएसएनएलमधील निवृत्त कर्मचारी तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी एकूण १६ निवृत्तीवेतन तक्रारी सादर केल्या. अदालतच्या सत्रादरम्यान घेतलेल्या सर्व तक्रारींचे निराकरण तात्काळ करण्यात आले, असे त्यांनी सांगितले.

निवृत्तीवेतन विषयक प्रकरणांच्या वेळेवर, कार्यक्षम आणि संवेदनशील हाताळणीचे महत्त्व अधोरेखित करताना डॉ. झा म्हणाले की तक्रार निवारण वेळेत होणे हे निवृत्तीवेतनधारकांच्या कल्याण आणि सन्मानासाठी अत्यावश्यक आहे. त्यांनी आश्वासन दिले की सीसीए कार्यालय अखंडित सेवा देत राहील आणि निवृत्तीवेतनधारकांनी मदत किंवा तक्रार निवारणासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी केव्हाही संपर्क साधावा.

# सहज व सोप्या भाषेत संविधानाची माहिती पुस्तक स्वरूपात उपलब्ध : राज्यपाल आचार्य देवव्रत



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणावर आधारित 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या पुस्तकाचे प्रकाशन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : नागरिकांना त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या समजावून सांगण्यासाठी अत्यंत सुंदर अशी संविधानिक चौकट भारतीय संविधानाने आखून दिलेली आहे. बंधुत्व आणि लोकशाहीचा भाव संविधानात आहे. संविधानाने समाजाला, राष्ट्राला जोडण्याचे काम केले. सहज व सोप्या भाषेत संविधानाची माहिती पुस्तक स्वरूपात उपलब्ध होत असल्याचे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या विषयावर २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत झालेल्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरादाखल केलेले भाषण पुस्तक स्वरूपात आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते लोकभवन येथे प्रकाशित करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे या पुस्तकाचे संकलन आणि संपादन करण्यात आले आहे. पुस्तक प्रकाशनप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील तसेच मंत्रिमंडळ व विधिमंडळ सदस्य उपस्थित होते.

राजभवनचे नामकरण लोकभवन झाले आहे, याचा आनंद आहे. आज भारत जगातील दुसरी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमुळे आपला देश आता वेगाने विकसित होत आहे. संविधानातील बारकावे या पुस्तकातून जाणून घेता येईल. इतर भाषेतही या पुस्तकाचा अनुवाद व्हावा, असे राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले.

**सर्वांगीण विचार करून संविधानाची निर्मिती – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारतीय संविधान हे जगातील एक सर्वोत्तम संविधान आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा विविध संस्थानांमध्ये विभाजित होता. देशात सांस्कृतिक ऐक्य होते, मात्र राजकीय ऐक्य नव्हते. त्यामुळे सर्वांना एकत्र करत सर्वांगीण विचार करून संविधान तयार करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान मूल्य जपणाऱ्या विविध देशाच्या लोकशाहीचा अभ्यास केला, आणि आपल्या देशातील शाश्वत मूल्यांवर आधारित संविधान निर्मिती केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुस्तक प्रकाशनप्रसंगी म्हणाले.

संविधानाने सर्वांना संधीची समानता दिली. संविधानिक व्यवस्था आपल्याकडे कुणीही केंद्रीत करू शकत नाही. देशातील अनेक खटल्यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. संसद आणि न्यायालयाचे अधिकार परिभाषित केले आहेत. पुस्तक वाचल्यानंतर सर्वसामान्य माणूस देखील भारताचे संविधान व त्याची मूल्ये समजू शकेल, असे ते म्हणाले. यापूर्वी 'बजेट कसे असावे' हे पुस्तक अतिशय सोप्या भाषेत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. संविधान हे सोपे आहे, क्लिष्ट नाही हे सांगण्याचा पुस्तकाच्या माध्यमातून प्रयत्न केला. आता ते पुस्तक स्वरूपात उपलब्ध होणार असल्याचा आनंद असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले.

**इतर भाषेतही पुस्तकाचा अनुवाद व्हावा – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

संविधानाची माहिती अत्यंत सोप्या भाषेत नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणावर आधारित हे पुस्तक अत्यंत सोप्या भाषेत संविधान सर्वांपर्यंत पोहोचवेल. विधिमंडळाची गौरवशाली परंपरा आहे. ही परंपरा अनेक वर्षापासून जपण्यात आली आहे. अनेक देशांकडे आपआपले संविधान आहे. मात्र आपले संविधान हे समाजाचा सर्वांगीण विचार करणारे आहे. या पुस्तकाचा अनुवाद इतर भाषेतही व्हावा, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

श्री.फडणवीस हे संविधान समजून घेणारे आणि पुस्तक रूपात मांडणारे मुख्यमंत्री आहेत. सर्वच विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास असतो. बजेटवर त्यांनी अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले आहे. आज प्रकाशित होणारे पुस्तक अनेकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. राज्यशास्त्राचे विद्यार्थी, लोकनेते, नागरिक सर्वांनी हे पुस्तक संग्रही ठेवावे, असेच आहे.

**संविधानिक विचार सोप्या शब्दात पोहोचतील – विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर**

जनसामान्यांना सोप्या शब्दात संविधानाची माहिती व्हावी, यासाठी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या भाषणाची पुस्तक रूपात ओळख होण्याची गरज होती. या पुस्तकाच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत संविधानिक विचार सोप्या शब्दात पोहोचतील, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी आपल्या प्रस्तावनेत व्यक्त केला. या पुस्तकातून संविधानातील तरतुदीची माहिती मिळेल, असे ते पुढे म्हणाले.

विधानसभेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आभार मानले. लोकभवन नामकरण झाल्यानंतर संविधानावर आधारित पुस्तक प्रकाशन सोहळा लोकभवन येथे आयोजित करण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये, राज्यशास्त्राचा अभ्यासकांना हे पुस्तक उपयुक्त ठरेल. अतिशय सोप्या भाषेत हा संदर्भग्रंथ सर्वांना निश्चित उपयोगी ठरेल, असे प्रा.शिंदे यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या पुस्तकाची प्रत विधिमंडळाच्या ्.ाश्री. ेस.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे. कार्यक्रमादरम्यान केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला. तसेच मुख्यमंत्र्यांच्या आतापर्यंतची वाटचाल अधोरेखित करणारी ध्वनिचित्रफित यावेळी दाखविण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आतापर्यंत ५४ सामंजस्य करार; पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प देशातील सर्वात मोठा प्रकल्प असणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्याने पंप स्टोरेजमध्ये ७६,११५ मेगावॅट वीजनिर्मिती क्षम तेपर्यंत मजल मारली आहे.महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य असून महाराष्ट्रात पंप स्टोरेज प्रकल्पांच्या उभारणीसाठी झालेल्या करारांमुळे ५,८०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेची वाढ होणार आहे. या प्रकल्पात २३,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ११,५०० रोजगार निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**करारांमुळे ५,८०० मेगावॅट वीजनिर्मितीत वाढ होणार या प्रकल्पात २३,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ११,५०० रोजगार निर्मिती होणार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प, कोयना टप्पा- ६ उदंचन जलविद्युत प्रकल्प आणि सरोवर उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी जलसंपदा विभाग आणि जेएसडब्लू निओ एनर्जी लि., महाजेनको रिन्यूबल एनर्जी लि.व न्यु एशियन इन्फ्रा. डेव्हलपमेंट प्रा.लि. यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले.

या कार्यक्रमास जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण खोरे) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार सुरेश खाडे, आमदार नरेंद्र मेहता, आमदार चित्रा वाघ, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र पंप स्टोरेज क्षमतेच्या दृष्टीने देशात आघाडीवर आहे. आपल्याकडे पश्चिम घाट आणि मोठ्या धरणांची प्रणाली असल्याने पंप स्टोरेजसाठी अत्यंत अनुकूल पर्यावरण उपलब्ध आहे. केंद्र शासनाचे यात सहकार्य मिळत असून या प्रकल्पांना गती मिळणार आहे. नवीकरणीय ऊर्जेतील अस्थिरता संतुलित करण्यासाठी पंप स्टोरेज प्रकल्प मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरणार आहे. कमीत कमी वेळेत प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने काम करतील.

राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण ५४ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे ७६ हजार ११५ मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. त्यामुळे रुपये ४.०६ लाख कोटी इतकी गुंतवणूक व १.२५ लाख मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सामंजस्य करारातील उदंचन जलविद्युत प्रकल्पांची नावे व थोडक्यात माहिती

१. पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प - या प्रकल्पासाठी जेएसडब्ल्यु निओ एनर्जी लिमिटेड हे गुंतवणूक करणार असून ता. भोर, जि. पुणे व ता. महाड, जि. रायगड येथे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाची ५,२०० स्थापित क्षमता (मे.वॅ) असून १९,९५० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून ७,००० रोजगार निर्मिती होणार आहे. हा देशातील सर्वात मोठा प्रकल्प असणार आहे.

२. कोयना टप्पा-६ उदंचन जलविद्युत प्रकल्प - या प्रकल्पासाठी महाजेनको रिन्युएबल एनर्जी लि. (एमआरईएल) हे गुंतवणूक करणार असून कोयना, ता.पाटण जि. सातारा येथे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाची ४०० स्थापित क्षमता (मे.वॅ) असून २,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून २, ५०० रोजगार निर्मिती होणार आहे.

३.सरोवर उदंचन जलविद्युत प्रकल्प - या प्रकल्पासाठी न्यु एशियन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रा. लिमिटेड गुंतवणूक करणार असून हा प्रकल्प ता. अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाची २०० स्थापित क्षमता (मे.वॅ) असून १,०५० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून २,००० रोजगार निर्मिती होणार आहे.

या तिन्ही प्रकल्पांची ५,८०० (मे. वॅ) स्थापित क्षमता असणार आहे. या प्रकल्पांसाठी २३,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या तिन्ही प्रकल्पाच्या माध्यमातून ११,५०० रोजगार निर्मिती होणार आहे.

राज्यात सार्वजानिक खासगी भागीदारीद्वारे (पीपीपी) उदंचन जलविद्युत प्रकल्प उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसन करण्याचे धोरण २० डिसेंबर २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. या धोरणास अनुसरून जेएसडब्लू निओ एनर्जी लि. महाजेनको रिन्यूबल एनर्जी लि.व न्यु एशियन इन्फ्रा. डेव्हलपमेंट प्रा.लि. या विकासकासोबत सामंजस्य करार करण्यात आले.

---

### राज्यस्तरीय स्पर्धेत नेहाला चोरघेचा तिसरा क्रमांक - शाळेत आनंदाचा जल्लोष

# क्रीडा शिक्षक कांतीलाल पाटील यांची नॅशनल कोच म्हणून निवड





विद्यार्थिनी एंजल पारचेची नॅशनल सायकलिंग स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/ केतन भोज : डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेने क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे.शाळेचे क्रीडा शिक्षक कांतीलाल पाटील यांची नुकतीच नॅशनल कोच म्हणून निवड झाली असून,बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांना सक्षम खेळाडू म्हणून घडविण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. अहमदनगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेत शाळेतील विद्यार्थिनी एंजल पारचे हिने उत्कृष्ट कामगिरी करत नॅशनल सायकलिंग स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.तसेच या स्पर्धेत नेहाला चोरघे याने कठीण स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकवून शाळेच्या क्रीडा कामगिरीत भर घातली.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.नंदकुमार मारुती जाधव,संस्थेचे खजिनदार अतुल वाणी,सचिव सुरेश जाधव.तसेच सौ.श्रेया नंदकुमार जाधव यांनी विद्यार्थ्यांचे आणि क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीनंतर शाळेतील सर्व कर्मचारी,पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# डुबेरे विद्यालयात कर्मवीर गणपत दादा मोरे यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी :- मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलीत डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मविप्र संस्थेचे आद्य संस्थापक कर्मवीर गणपत दादा मोरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

अध्यक्षांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते . व्यासपीठावर पर्यवेक्षिका जयश्री पगारे , सुनील ससाणे ,मारुती डगळे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते कर्मवीर मोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तनुजा कडभाने,ऋतुजा वामने या विद्यार्थिनीनीसह उपशिक्षक सोमनाथ गिरी यांनी कर्मवीर मोरे यांच्या कार्याची आोळख करून दिली. यावेळी बोलताना मुख्याध्यापक उगले म्हणाले की ,मविप्र संस्थेचे आश्रयदाते तसेच आद्य संस्थापक सत्यशोधक कर्मवीर मोरे यांनी गोरगरीब जनतेची, समाजाची व मविप्र संस्थेची अहोरात्र सेवा केली. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तसेच उगले यांनी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा परिचय करून दिला.




केले.वर्गशिक्षक डी. ए.रबडे व जयश्री गोहाड मार्गदर्शनाखाली इयत्ता- १० वी तु-ब च्या वर्गाने कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी संस्कृती वारुंगसे व ऋतुजा वारुंगसे हिने केले तर आभार प्रदर्शन श्रावणी माळी केले .यावेळी शिक्षक ,शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

---

# बनावट वेबसाईटस्, ॲप आणि खोट्या ई-चालान लिंकपासून सावध राहा; परिवहन विभागाचे नागरिकांना आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील वाहनधारक आणि चालकांची आर्थिक फसवणूक वाढल्याच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने बनावट वेबसाईटस्, संशयास्पद मोबाईल प्स (एपीके) आणि खोट्या ई-चालान लिंकपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चालान यांसारख्या सेवांच्या नावाखाली अनेक नागरिकांची वैयक्तिक माहिती व आर्थिक व्यवहारांची फसवणूक होत असल्याचे परिवहन विभागाच्या निदर्शनास आले आहे.

परिवहन विभागाने सांगितले आहे की, फसवणूक करणारे मोबाईल एसएमएस किंवा व्हॉट्सप संदेशांद्वारे 'चलन बाकी आहे', 'परवाना सस्पेंड होणार आहे' अशा धमकीपर संदेशांसह अनधिकृत पेमेंट लिंक पाठवून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत आहेत. परिवहन विभागाने याबाबत स्पष्ट सांगितले की, आरटीओ कार्यालय किंवा परिवहन विभाग नागरिकांना कधीही व्हॉट्सॲप वरून पेमेंट लिंक पाठवत नाही. तसेच "RTO Services.apk',"mParivahanšUpdate.apk', "eChallan Pay.apk' अशी अज्ञात एपीके फाईल्स डाउनलोड केल्यास मोबाईलमधील ओटीपी, बँकिंग माहिती आणि इतर संवेदनशील माहिती चोरी होण्याचा धोका आहे.

नागरिकांनी तक्छ - (वाहन नोंदणी) https://vahan.parivahan.gov.in, SRTHI (ड्रायव्हिंग लायसन्स सेवा) https://sarathi.parivahan.gov.in, परिवहन सेवा पोर्टल

https://www.parivahan.gov.in तसेच ई-चालान पोर्टल

https://echallan.parivahan.gov.in या gov.in डोमेनच्या अधिकृत सरकारी संकेतस्थळांचाच वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे .com, .online, .site, .in किंवा इतर कोणत्याही डोमेनवरील वेबसाइटवर वाहनधारकांनी माहिती नोंदवू नये. कोणताही संशयास्पद संदेश किंवा लिंक प्राप्त झाल्यानंतर तात्काळ नॅशनल सायबर क्राईम पोर्टलचे https://www.cybercrime.gov.in, सायबर फसवणूक हेल्पलाइन क्रमांक १९३० किंवा जवळचे जिल्हा सायबर पोलीस स्टेशन या ठिकाणी तक्रार नोंदवावी, असे आवाहन सह परिवहन आयुक्त (संगणक) शैलेश कामत यांनी केले आहे.

# कळंब तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब:प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र शासनाने राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन तसेच आरोग्य सुविधा , मोफत औषधोपचार , तसेच इतर सवलती साठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला आहे , या विषयीची अंमलबजावणी ५ डिसेंबर पासून सुरू करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे. या सुविधासाठी आवश्यक कागदपत्रात ६० वय वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र अनिवार्य केले आहे. परंतु सदरील ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र कळंब तहसील कार्यालयाकडून दिले जात नाहीत. सदरील ओळखपत्र धाराशिव व अन्य तहसील कार्यालयाकडून देण्यात येत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. त्यानुषंगाने



याविषयीचे निवेदन कळंब तहसील चे नायब तहसीलदार गोपाळ तापडिया यानां ज्येष्ठ नागरिक महासंघ यांच्या वतीने सदरील मागणी चे निवेदन देण्यात आले आहे. या विषयी तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, जिल्हा उपाध्यक्ष अच्युतराव माने, तालुका सचिव माधवसिंग राजपूत, कार्यकारणी सदस्य रामभाऊ कवडे, बशीर पठाण, गुलाब बागवान, कल्याण खापे. यांनी केली आहे.

---

**विविध मागण्यांसाठी आंदोलन; सरकारकडे करणार पाठपुरावा**

# आमदार अभिजीत पाटील यांचा पोलिस पाटील संघटनेच्या आंदोलनास पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/नागपूर : नागपूर येथे राज्यातील पोलीस पाटील यांचे विविध मागण्या संदर्भात आंदोलन चालू असून या आंदोलनस्थळी आज माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी भेट देवून या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला.

यावेळी बोलताना आमदार अभिजीत पाटील म्हणाले की, पोलीस पाटील अधिनियम १९६७ मध्ये दुरुस्ती होवून या अधिनियमाचे काटेकोरपणे अमंलबजावणी व्हावी. तसेच पोलीस पाटील यांचे नुतणीकरण कायमस्वरुपी बंद करावे. याचबरोबर पोलीस पाटील यांची वयोमर्यादा ६० वर्षावरुन ६५ वर्षे करावी तसेच सन २०१९ पासून राज्यातील पोलीस पाटील यांच्या वारसांना अनुकंपा कायदा लागू करण्यात यावा. पोलीस पाटील यांना सेवानिवृत्ती नंतर एकरकमी २० लाख रुपये मिळावेत तसेच पोलीस पाटील यांच्या करिता कल्याण निधी स्थापन करावा.



अंशकालिन गृह विभाग व महसूल विभागामध्ये पद भरतीमध्ये ज्यांची किमान १० वर्षे सेवा पूर्ण झाली आहे, त्यांना समांतर आरक्षण मिळावे.तसेच अतिरिक्त पदभार असलेल्या गावामध्ये २५% अतिरिक्त मानधन मिळावे.पोलीस पाटील यांचे मानधन व प्रवास भत्ता प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत मिळावा. आणि पोलीस पाटील यांना विमा कवच लागू करावे. राज्यशासनाने तातडीने या आंदोलनाची दखल घेऊन सर्व मागण्या त्वरित मान्य करून पोलिस पाटील संघटनेला न्याय द्यावा अशी विनंती केली..

### उटी (बु)गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत

# सीआरपीएफ जवानांकडुन गाव स्वच्छता मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : सी. आर. पी. एफ. व आर. टी. सी. जवानांकडून औसा तालुक्यातील उटी (बु) ग्रामपंचायत येथे भव्य स्वच्छता उपक्रम राबवण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत उटी (बु.), गावात आज मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमामध्ये CRPF, RTC जवानांच्या टीमने अत्यंत उत्साहाने आणि सामाजिक बांधिलकी जपत सक्रिय सहभाग नोंदविला. उटी गावाच्या विकास, सौंदर्यवृद्धी आणि स्वच्छ पर्यावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या उपक्रमाचे ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी मनःपूर्वक स्वागत केले.

CRPF जवानांनी गावातील मुख्य रस्ते, सार्वजनिक स्थळे, शाळा परिसर, ग्राम पंचायत परिसर आणि महत्त्वाच्या ठिकाणी स्वच्छता करत कचरा वेचुण गाव स्वच्छता केली. गावात प्लास्टिकमुक्तीचा संदेश देणे आणि नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणे या महत्त्वपूर्ण कामगिरीत मोलाचे योगदान दिले.

**उटी येथे राबवत असलेल्या स्वच्छता उपक्रमाची वैशिष्ट्ये :**



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाशी सुसंगत असा उपक्रम, CRPF RTC जवानांचा उत्साहपूर्ण सहभाग, गावात स्वच्छतेबाबत जागृती आणि जनप्रबोधन, प्लास्टिकमुक्ती आणि पर्यावरणस्नेही संदेश, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता व सुशोभीकरण, स्वच्छता ही सेवा व स्वच्छ गाव - समृद्ध गाव या भावनेचा प्रसार, ग्रामपंचायतीकडून अभिमान व आभार, ग्राम पंचायत उटी (बु.) तर्फे CRPF RTC जवान टीमचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. यावेळी सेवेसोबतच समाजासाठी अशा उपक्रमात त्यांनी दाखविलेला सहभाग अनुकरणीय आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान स्वच्छतेकडे पाऊल, समृद्धीकडे वाटचाल करीत उटी (बु )गावला मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत गाव पर्यावरण पुरक स्वच्छ सुजलाम सुफलाम करण्याचा संकल्प असल्याचे यावेळी सांगितले.

यावेळी उटी गावचे मा. सरपंच ॲड. भालचंद्र पाटील, विद्यमान सरपंच वैशाली कांबळे, उपसरपंच रफीक शेख, कर्तव्यदक्ष अभ्यासु ग्रामपंचायत अधिकारी महेश जगतापसह ग्रामपंचायत सदस्य रामदास भोजने, तानाजी कांबळे, चंद्रकांत भोकरे, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्यावर सर्वच स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# ‘व्हॉईस ऑफ मीडियाचे आजपासून उपोषण

## राज्यातील सर्व पत्रकारांच्या ३३ मागण्यांसाठी मुख्यमंत्र्यांकडे कार्यवाहीची मागणी;

## सरकार पत्रकारांवर सातत्याने अन्याय करीत असल्याचा संदीप काळे यांचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्यातील पत्रकार, डिजिटल माध्यमे, साप्ताहिक आणि रेडिओ या पत्रकार यांना भेडसावणाऱ्या गंभीर प्रश्नांबाबत ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ ‘VOM इंटरनॅशनल फोरम’ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधत, आजपासून नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथे उपोषण (दि. ११ डिसेंबर) सुरू केले आहे. पंढरपूर येथे नुकत्याच झालेल्या राज्य शिखर अधिवेशनात सर्वसंमतीने मंजूर झालेल्या ३३ मागण्यांवर तातडीची कार्यवाही करण्याची मागणी येथे करण्यात आली आहे.

या मागण्यामध्ये पत्रकारांची सुरक्षा, माध्यमसंस्थांची आर्थिक शाश्वतता आणि लोकशाहीतील पारदर्शकता यासाठी शासनाने ठोस निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे म्हंटले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जाहिरात बिले, पडताळणी प्रक्रिया, दरवाढ, डिजिटल माध्यमांची नोंदणी, तसेच पत्रकारांसाठी आरोग्यविमा, पेन्शन व संरक्षण यंत्रणा यांसह तातडीच्या मुद्द्यांकडे शासनाने सकारात्मक दृष्टीने पाहण्याची मागणी करण्यात आली.

अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या ३३ मागण्यांमध्ये,पत्रकार महामंडळ तात्काळ कार्यान्वित करून किमान ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करावा. अनेक वर्षांपासून अडकलेल्या माध्यमांच्या शासकीय बिल तातडीने द्यावे. पाच वर्षांपासून दरवाढ न झाल्याने किमान २००% दरवाढ द्यावी. दैनिकांची २०२३-२०२४ पडताळणी व द्विवार्षिक पडताळणीवरील निर्णय १५ दिवसांत देऊन ऋठ काढावा. सर्व विभागांची दोन वर्षांपासून थकीत बिले ३० दिवसांत देण्याचे आदेश द्यावेत. माहिती विभागाच्या नियमावली-चे उल्लंघन करून इतर मार्गाने दिल्या जाणाऱ्या जाहिरातींवर कडक कारवाई करावी. सध्याच्या काळात ६०% नी कमी झालेल्या शासकीय जाहिराती पुन्हा वाढवाव्यात. सर्व मान्यताप्राप्त माध्यम संस्थांसाठी पत्रकारांचे किमान मासिक मानधन शासनाने निश्चित करून सक्तीने अंमलात आणावे. पत्रकार सुरक्षा कायदा सक्षम करून तात्काळ ऋखठ, जलद न्यायालये व संरक्षण यंत्रणा लागू करावी. जिल्हा व तालुका पातळीवर ‘पत्रकार संरक्षण अधिकारी’ नेमावेत. पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी १० लाख आरोग्य विमा व २५ लाख अपघात विमा लागू करावा. पत्रकारांसाठी स्वतंत्र निवृत्तीवेतन योजना सुरू करावी. सर्व गृहनिर्माण योजनांमध्ये पत्रकारांसाठी २% राखीव कोटा निश्चित करावा. जिल्हा प्रेस क्लबांना तांत्रिक सुविधा, इंटरनेट, प्रशिक्षणासाठी विशेष निधी द्यावा. जिल्हा माहिती कार्यालयांत ‘मीडिया सपोर्ट सेल’ स्थापन करावा. डिजिटल पत्रकारिता, तथ्य-जांच, कायदे व नवीन तंत्रज्ञानासाठी राज्यस्तरीय प्रशिक्षण अकादमी स्थापन करावी. डिजिटल न्यूज पोर्टल नोंदणी प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने तातडीने सुरू करावी. शासनविरोधी बातम्यांमुळे नोंदविलेले बिनबुडाचे गुन्हे मागे घेण्यासाठी स्वतंत्र समिती नेमावी. दुर्घटना, आपत्ती व आजारांमध्ये अडचणीत सापडलेल्या पत्रकारांसाठी तातडीचा मदत निधी निर्माण करावा. महिला पत्रकारांसाठी सुरक्षित प्रवास, निवास सुविधा, मातृत्व रजा, क्रेच व लैंगिक छळ प्रतिबंध यंत्रणा बळकट करावी. राज्य, जिल्हा व राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार सन्मान पुरस्कारांना आर्थिक स्वरूप देऊन ‘पत्रकार गौरव योजना’ सुरू करावी. जिल्हा माहिती अधिकारी व उपसंचालक पदे रिक्त असल्याने कामकाज ठप्प आहे; सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत. जाहिरात धोरणात नियमित साप्ताहिकांना अग्रक्रम द्यावा. जाचक अटी शिथिल करून साप्ताहिक नियतकालिकांची परंपरा टिकून राहील, याची व्यवस्था करावी. दैनिक व साप्ताहिक माध्यमांमधील भेदभाव दूर करून, दैनिकांप्रमाणेच साप्ताहिक प्रतिनिधींनाही शासन-प्रशासनात समान सन्मान द्यावा. न्यूज पोर्टल, यूट्यूब न्यूज चॅनेल व इतर डिजिटल प्लॅटफॉर्मना अधिकृत वृत्त माध्यमाचा दर्जा द्यावा. डिजिटल पत्रकारितेसाठी स्वतंत्र व पारदर्शक नियमावली तयार करावी. जाहिरात धोरणात डिजिटल माध्यमांसाठी स्वतंत्र प्राधान्य निश्चित करावे. रेडिओमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना शासनाकडून अधिस्वीकृती व मान्यता द्यावी. केंद्र सरकारप्रमाणे राज्य सरकारकडूनही रेडिओ माध्यमांना जाहिराती वाढवाव्यात. पत्रकारांना मिळणाऱ्या सुविधा रेडिओ कर्मचाऱ्यांनाही मिळाव्यात. ठग (निवेदक) म्हणून काम करणाऱ्यांना मालकांप्रमाणे इतर सुविधा व अधिकार द्यावेत. रेडिओ कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पेन्शन योजना लागू करावी. करण्याची मागणीही अधोरेखित करण्यात आली.

संदीप काळे, संस्थापक व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष-व्हॉईस ऑफ मीडिया, तसेच अनिल म्हस्के, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष-व्हॉईस ऑफ मीडिया यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात हे सारे नमूद केले आहे. संदीप काळे यांनी महाराष्ट्र सरकारवर रोष व्यक्त करीत सरकार सतत पत्रकार यांच्यावर अन्याय करीत आहे असा आरोप केला आहे. तर अनिल म्हस्के यांनी ह्या मागण्या मान्य नाही केल्या तर साखळी उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनात राज्यभरातून पदाधिकारी सहभागी होत आहेत.

या आंदोलनात ‘व्हॉईस ऑफ मीडियाच्यासर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी सहभागी होण्यासाठीचे आवाहन व्हॉईस ऑफ मीडिया महाराष्ट्र यांनी केले आहे.

# कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांना हमीभाव ठरवून उसाचा पहिला हप्ता तात्काळ देण्याची छावा संघटनेची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाचा पहिला हप्ता हमीभाव ठरवुन तात्काळ अदा करावा अशा मागणीचे निवेदन अखिल भारतीय छवा संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी मा. गणेश शिंदे यांना शिष्टमंडळाच्या वतीने दि.१० डिसेंबर २०२५ रोजी देण्यात आले. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, अतिवृष्टीमुळे चालु वर्षातील खरीप हंगाम पुर्णतः उद्धस्त झाला असून शेतकऱ्याच्या हातात काहीच न पडल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति बिकट झाली आहे. परिसरातील ऊस कारखाने सुरु होवून महीना उलटुन गेला असून, अद्यापही उसाचा हमिभाव ठरवून



पहिला हप्ता मिळालेला नाही. त्याच बरोबर कारखान्यांकडुन शेतकऱ्यांना कुठल्याही पद्धतीने चर्चा किंवा बैठक घेऊन ऊसाचा दरही निश्चित झालेला नाही. त्यामुळे शेतकरी संभ्रमात पडला आहे. तर वर्षभर कष्ट करुन मोठा खर्च करुन पिकवलेला ऊस शेतकऱ्यांकडुन कोणताही हमी भाव जाहीर न करता कारखान्यांनी ऊस घेणे सुरूच ठेवले आहे. तर हमीभाव न ठरवून त्यांची उसाची बिले प्रलंबीत ठेवणे ही गंभीर बाब असून तो शेतकऱ्यांवर होणाराअन्याय आहे. खरीप हंगाम गेला असून शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. कारखान्यांना विविध सवलती व अनुदाने मिळतात, मात्र शेतकऱ्यांच्या शेतीमालाला व घामाला किंमत दिली जात नाही. लवकरात लवकर ऊसाचा दर जाहीर करून पहिला हप्ता अदा करण्यात यावा. तसेच पहिला हप्ता अदा केला गेला नाही, तर प्रत्येक कारखान्यावर जावून छावा स्टाईलने आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. दिलेल्या निवेदनावर छावा संघटनेच्या महिला आघाडी मराठवाडा अध्यक्ष राजकन्या जावळे, कळंब तालुका अध्यक्ष विठ्ठल यादव,शहराध्यक्ष अमर गायकवाड, राजकुमार सावंत, हनुमंत घाडगे, लाला कांबळे, अमोल कसबे, मकरंद पुरी, अजय देवकुळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# येत्या शनिवारी स्वेरीत माजी विद्यार्थी मेळावा आणि पदवीप्रदान समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ‘गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा 'माजी विद्यार्थी मेळावा' आणि ‘पदवीप्रदान समारंभ’ स्वेरी कॉलेज कॅम्पस मध्ये येत्या शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे.’ अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.




दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरचा 'माजी विद्यार्थी मेळावा' व ‘पदवीप्रदान समारंभ’ आयोजित करण्यात आलेला आहे. या माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी स्वेरीच्या स्थापने पासूनच्या पहिल्या बॅच पासून पुढील सर्व विद्यार्थ्यांना आमंत्रित केले आहे. तर ‘पदवीप्रदान समारंभ’ करिता मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आमंत्रित केले आहे. या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राध्यापकांसोबत तसेच इतर विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधता येणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून माजी विद्यार्थी हे त्यांच्या आठवणींना उजाळा देणार आहेत. 'या कार्यक्रमासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी व मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी यासाठी उपस्थित रहावे.’ असे आवाहन ‘माजी विद्यार्थी संघटना’आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने करण्यात आले आहे. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर, उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके, सचिव डॉ.करण पाटील आणि स्वेरीचे प्राध्यापक वर्ग हे या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करत आहेत. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली या माजी विद्यार्थी मेळाव्याची व पदवीप्रदान समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

# सांगोला विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांसंदर्भात आ. डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी घेतली मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी नागपूर येथे राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी ग्राम विकास मंत्री मा.ना.जयकुमार गोरे व दौंडचे आमदार मा.राहुल कुल देखील उपस्थित होते.



सांगोला विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली असून यावेळी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी यावर सकारात्मकता दाखवत सांगोला विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्याचबरोबर मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी स्वर्गीय आमदार भाई गणपतरावजी देशमुख साहेब यांच्या आठवणींना उजाळा दिला व सांगोला विधानसभा मतदारसंघाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस साहेब यांनी प्रलंबित प्रश्न सोडविण्यासंदर्भात सकारात्मकता दर्शवल्याने आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी त्यांचे आभार मानले.

# रामनगर जंजिरा सोसायटी येथील शौचालय पुनर्बांधणीच्या कामात कंत्राटदाराकडून कुचराई; कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या मनपा एन विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : घाटकोपर पश्चिम प्रभाग क्रमांक १२३ जंजिरा सोसायटी,राम नगर(ब) येथील स्थानिक नागरिकांकरिता अगोदर याठिकाणी दुमजली शौचालय होते.तरी शौचालय दुरुस्तीच्या नावाखाली जुने दुमजली शौचालय पाडून त्याच ठिकाणी आता नवीन शौचालय बांधण्यात येणार आहे.परंतु येथील शौचालयच्या पुनर्बांधणीचे काम मागील दोन वर्षांपासून रखडलेल्या स्थितीत असल्यामुळे स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.तसेच येथील जुने शौचालय पुनर्बांधणीसाठी पाडण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांसाठी याठिकाणी संबंधित मनपा एन विभाग तसेच संबंधित शौचालय बांधकामाच्या कंत्राटदाराकडून तात्पुरती शौचालयाची व्यवस्था करून देण्यात आली असली तरी त्या तात्पुरती शौचालयांची रोजच्या रोज स्वच्छता होत नसल्यामुळे आणि तात्पुरती शौचालयांची अवस्था देखील बिकट झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्याप्रमाणावर अस्वच्छतेला सामोरे जावे लागत असून स्थानिक नागरिकांची कुचंबना होत आहे.तसेच संबंधित मनपा एन विभागाचे तसेच शौचालय बांधकामाच्या कंत्राटदाराचे याठिकाणी दुर्लक्ष होत आहे त्यामुळे स्थानिक नागरिक याविरुद्ध प्रचंड संताप व्यक्त करताना दिसत आहेत.

> **स्थानिक नागरिकांची कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी**

जंजिरा सोसायटी,रामनगर(ब) येथील शौचालयच पुनर्बांधणीसाठी मुंबई महानगरपालिका एन विभागाकडून टेंडर काढून देखील संबंधित कंत्राटदाराने येथील दुमजली शौचालययाचे बांधकाम विहित कालावधीत पूर्ण न केल्याने मनपा एन विभाग प्रशासन या शौचालय पुनर्बांधणीच्या कामात कुचराई करणाऱ्या कंत्राटदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई करताना का दिसत नाही ? संबंधित मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे प्रभाग क्रमांक १२३ चे संबंधित अधिकारी याठिकाणी कंत्राटदाला पाठीशी घालताना दिसत असून त्या अधिकाऱ्यांचे देखील या शौचालयच्या कंत्राटदारासोबत



काही आर्थिक हितसंबंध आहेत का ? याची मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांनी चौकशी करणे गरजेचे आहे.तसेच येथील शौचालयाचे बांधकाम तत्काळ पूर्ण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

## संघटनेच्या मागण्या मान्य करून न्याय देण्याची मागणी

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेच्या आंदोलनास पाठिंबा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेच्या आंदोलनास उपस्थित राहून पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी राज्य शासनाकडे मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेच्या सर्व मागण्या त्वरित मान्य करून त्यांना न्याय द्यावी अशी मागणी केली.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी रोजगार व मानधनात दुप्पट वाढ मिळाली पाहिजे यासाठी हे आंदोलन चालू असून मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत राज्यातील एक लाख ७५ हजार युवक आणि युवतींना खाजगी व शासकीय आस्थापनेमध्ये ११ महिन्याचे प्रशिक्षण देण्यात आले असून प्रशिक्षण पूर्ण करून पुन्हा हे युवक आणि युवती प्रशिक्षित बेरोजगार होण्याची वेळ त्यांच्यावर शासनाच्या नाकर्त्या धोरणामुळे आली. म्हणून प्रशिक्षित बेरोजगार युवक आणि युवतींना त्यांच्या शैक्षणिक क्षमतेनुसार विविध शासकीय आस्थापनेमध्ये त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळाला पाहिजे व मानधनांमध्ये दुप्पट वाढ झाली पाहिजे अशी मागणी यावेळी बोलताना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी राज्य सरकार कडे केली.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक बातम्यांमध्ये प्रसारमाध्यमांनी भारत निवडणूक आयोगाचे चिन्ह वापरु नये - मुख्य निवडणूक अधिकारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांकडून दिल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाशी संबंधित चिन्हे, इमारतींची दृश्ये किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या छायाचित्रांचा वापर केल्याची काही प्रकरणे दिसून आली आहेत. यातील संभ्रम दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी प्रसारमाध्यमांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सांगितले की, संसदीय, विधानमंडळ तसेच राष्ट्रपती -उपराष्ट्रपती निवडणुका घेण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगाची असून राज्यात या कामकाजासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. सध्या महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय अधिकारी एस. चोक्कलिंगम कार्यरत आहेत. दुसरीकडे, संविधानातील अनुच्छेद २४३के व २४३झेडए नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचालन, निर्देशन आणि नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयुक्त पदावर निवृत्त प्रधान सचिव दिनेश वाघमारे कार्यरत आहेत.

दोन्ही आयोगांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी व स्वतंत्र असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह, अधिकारी, इमारती अथवा तत्सम दृश्यांचा वापर करणे चुकीचे असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

तसेच, राज्य निवडणूक आयोगाशी संबंधित बातम्यांमध्ये झालेल्या अशा चुकांची तातडीने दुरुस्ती करून संबंधित व्हिडिओ समाजमाध्यमांतून हटवावेत, असे आवाहनही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्रसारमाध्यमांना करण्यात आले आहे.